# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

## जगद्‌गुरू संत तुकाराम महाराज अध्यासन

**डॉ. हेमराज निखाडे**
अध्यासन समन्वयक
जगद्‌गुरू संत तुकाराम महाराज अध्यासन
hemrajnikhade2@gmail.com/8928254983

पदव्युत्तर मराठी विभाग,
गोंडवाना विद्यापीठ
गडचिरोली ४४२६०५

---

जावक क्र / १८३४

दि. १०/०४/२०२४

## जगद्‌गुरू संत तुकाराम महाराज अध्यासन केंद्र आयोजित निबंध स्पर्धा

जगद्‌गुरू संत तुकाराम महाराज यांच्या विचाराचा प्रचार प्रसार व्हावा, यादृष्टीने विविध उपक्रम गोंडवाना विद्यापीठातील अध्यासनाच्या वतीने राबविण्याचे ठरले आहे. यावर्षी पहिल्यांदा जगद्‌गुरू संत तुकाराम महाराज अध्यासन केंद्राच्या वतीने विद्यापीठ स्तरीय निबंध स्पर्धेचे आयोजन केले आहे. सदर निबंध स्पर्धेबाबत आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना सहभागी करून सहकार्य करावे.

१) निबंध सादर करण्याची अंतिम तारीख २५ एप्रिल २०२४ सायं. ०५ वाजेपर्यंत असेल. नंतर प्राप्त झालेले निबंध विचारात घेतले जाणार नाही. विद्यार्थ्यांना स्पर्धेत सहभागी होण्याकरिता महाविद्यालयाने प्रोत्साहित करावे ही विनंती.

**निबंधाचे विषय**

१) जगद्‌गुरू संत तुकारामाच्या साहित्यातील सामाजिकता
२) जगद्‌गुरू संत तुकारामाचे व्यक्तिमत्व : अभंगगाथा
३) जगद्‌गुरू संत तुकारामाचे वारकरी संप्रदायात योगदान
४) जगद्‌गुरू संत तुकाराम काल, आज आणि उद्‌या

**वरीलपैकी कोणत्याही एका विषयावर निबंध लिहावा.**

**स्पर्धेचे बक्षीस**

१) प्रथम क्रमांक – रू. ४०००/– रोख, प्रमाणपत्र
२) द्वितीय क्रमांक – रू. ३०००/– रोख, प्रमाणपत्र
३) तृतीय क्रमांक – रू. २०००/– रोख, प्रमाणपत्र
४) प्रोत्साहनपर बक्षीस – ०३ निबंधांना तुकाराम गाथा व प्रमाणपत्र भेट दिल्या जाईल.

# निबंध स्पर्धेचा तपशील

**अ) निबंध स्पर्धेचे सर्व साधारण निकष पुढीलप्रमाणे**

१) निबंधातील आशय संपन्नता
२) अद्ययावतता, सामाजिक बांधिलकी
३) वैचारिक मांडणी, तर्कशुध्दता
४) भाषा शैली व परिणामकारकता
५) प्रमाणलेखन

**ब) निबंधाबाबत सर्वसाधारण अपेक्षा —**

१) संत तुकारामाचे समाज निरीक्षण, चिंतनशिलता यांचे प्रतिबिंब असावे.
२) निबंधाच्या शेवटी संदर्भग्रंथसूची असावी.
३) मुद्देसुदपणा आणि वैज्ञानिक दृष्टिकोन निबंधात अपेक्षीत आहे.

**क) स्पर्धकाची पात्रता —**

१) गोंडवाना विद्यापीठांतर्गत शिक्षण घेत असलेले पदवी व पदव्युत्तर पदवीचे सर्व विद्यार्थी.
२) चंद्रपूर व गडचिरोली जिल्ह्यातील सर्व वरिष्ठ महाविद्यालयीन विद्यार्थी.

**ड) स्पर्धेचे नियम व सर्वसाधारण सूचना**

१) निबंधाची शब्द मर्यादा ३००० पर्यंत असावी.
२) निबंधाचे माध्यम—मराठी असावे.
३) निबंध महाविद्यालयातील प्राचार्याने प्रमाणित केलेला असावा.
४) निबंध सुवाच्य हस्ताक्षरात व सुस्पष्ट भाषेत असावा.
७) निबंधाच्या सोबत प्राचार्याने सांक्षाकित केलेले एक स्व परिचय पत्र पाठविणे अनिवार्य आहे.
८) निबंध गोंडवाना विद्यापीठातील जगद्‌गुरू संत तुकाराम अध्यासन केंद्राला **दि. २५ एप्रिल २०२४ पर्यंत पोस्टाने किंवा स्वत: पोहचवावा.**
**टिप :—** दि. २५ एप्रिल २०२४ नंतर येणारा कोणताही निबंध स्विकारला जाणार नाही.

९) दि. २५ एप्रिल २०२४ नंतर सात दिवसाच्या आत स्पर्धेचा निकाल घोषीत केला जाईल व बक्षीस वितरण समारंभाचे आयोजन केले जाईल.
१०) सविस्तर माहितीकरिता अध्यासन समन्वयक डॉ. हेमराज निखाडे यांच्याशी संपर्क करावा. (संपर्क क्र. ८९२८२५४९८३)

**डॉ. हेमराज निखाडे**
समन्वयक,
जगद्‌गुरू संत तुकाराम महाराज अध्यासन केंद्र
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली